# मराठी आरती
## (मधुसूदन रचित)

**दोहा :** *जिथे कल्पना शब्द न जाती, ऐसा अपरम्पार*
*नेति म्हणुनि वेदही थकले, महिमा तुझा अपार*

मेहेर अवतारा स्वीकारा आरति ही तुमची
केली मनी निरंजनी लावुनि ज्योत मनाची ॥धृ.॥

धूप जाळुनी दीप लावुनी पुष्पे अर्पुनी
मोठेपण कां मजला तुमचे तुम्हां देवोनी ॥१॥

तुम्हीच कारक तुम्हीच तारक आदि तुम्ही अंती
तुमच्या सम हो तुम्हीच देवा दुसरी ना उक्ति ॥२॥

तुमची माया सर्व चराचरिं छाया ही तुमची
अनंत तुम्ही थोरी न कळे वर्णावी कैची ॥३॥

माझा मजला ठाव न महिमा सांगू तव कैसा
अज्ञपणे मी गातो भजतो माझा भाव असा ॥४॥

कृपावंत तुम्ही असीम तुम्हां काय कुणी द्यावे
एक मागणे स्मरण तुझे नित मधुसुदना व्हावे ॥५॥